देशदूत यूट्युब चॅनलसाठी क्यूआर कोड स्कॅन करा
YouTube
www.deshdoot.com

# देशदूत

शिल्पकार विकासाचा...




इंटरनेट आवृत्ती www.deshdoot.com | नाशिक | वर्ष ५६ । अंक ३३२ । शुक्रवार, दि. ८ ऑगस्ट २०२५ । पाने १२ | किंमत ₹ ५

## आतील पानात

संपादकीय
राजकीय गणिताची मांडामांड सुरू
पडसाद
कारखाने, भाडेपट्टा आणि मखलाशी
शेवटचे पान
भारत- पाकिस्तान सामना रद्द?

# निवडणुकीत हेराफेरी

## महाराष्ट्रात ४० लाख संशयित मतदार; राहुल गांधींचा आरोप

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**



काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी पुन्हा निवडणूक आयोगाला टीकेचे लक्ष्य केले आहे. निवडणूक आयोगाचा डेटा दाखवत एक लाख मतांची चोरी केवळ एकाच मतदार संघात झाल्याचा आरोप केला. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीतही मतांची हेराफेरी झाली असून ४० लाखांहून अधिक मते संशयाच्या भोवऱ्यात आहेत. निवडणूक आयोग या याद्यांवर गप्प का? असे म्हणत राहुल गांधी यांनी पत्रकार परिषदेत मतदार यादीतील अनियमिततेवर १ तास ११ मिनिटे २२ पानांचे सादरीकरण दिले.

महाराष्ट्रातील मतदानामध्ये झालेल्या घोटाळ्याच्या पुराव्यांचे सादरीकरण करताना राहुल गांधी म्हणाले की, महाराष्ट्रामधील विधानसभा निवडणुकीमध्ये चोरी झाली. महाराष्ट्रामध्ये आम्ही निवडणूक हरलो. महाराष्ट्रामध्ये सुमारे ४० लाख मतदार रहस्यमय आहेत. येथे पाच महिन्यांच्या कालावधीमध्ये अनेक नवे मतदार नोंदवले गेले. या मतदार यादीबाबत निवडणूक आयोगाने उत्तर दिले पाहिजे.

ते म्हणाले की, देशामध्ये बनावट मतदान होत आहे. आम्हाला ही चोरी पकडण्यात बराच काळ लागला. या मतदार यादीमध्ये अनेक लोकांच्या वडिलांच्या नावासमोर काहीही लिहिण्यात आलेले आहे. मतदार यादीत अनेक घरांचा पत्ता शून्य आहे. डुप्लिकेट मतदारांची संख्या खूप अधिक आहे.

### सत्ताधाऱ्यांचे प्रत्युत्तर

> महाराष्ट्रात मतदानांची चोरी झालेली नाही आणि देशात कुठेही मतदानांची चोरी झालेली नाही. मला वाटते राहुल गांधींच्या मेंदूची चीप चोरीला गेली आहे. त्यांची हार्ड डिस्क करप्ट झाली आहे, म्हणून ते नेहमी खोटे बोलत आहेत, ते जनतेचे जनमत चोरत आहेत.
>
> ■ **देवेंद्र फडणवीस,** मुख्यमंत्री

> मी एवढेच सांगतो की, जेव्हा ते हरतात... आता बिहारच्या निवडणुकांमध्ये ते हरणार आहेत. याचा अंदाज आता त्यांना लागलेला आहे. त्यामुळे हे सगळे रडगाणे सुरू आहे. एक परिस्थिती तयार करण्याचे काम सुरू आहे.
>
> ■ **एकनाथ शिंदे,** उपमुख्यमंत्री

## मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांचे राहुल गांधींना पत्र

मतदार यादीत घोटाळा झाल्याचा आरोप करत भारत निवडणूक आयोगावर हल्लाबोल करणारे काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी गुरुवारी पत्र पाठवले. मतदार यादीत अयोग्यरीत्या समाविष्ट किंवा वगळले गेलेल्या नावांचे तपशील असलेली सहीयुक्त घोषणापत्र आपण सादर करावे जेणेकरून आवश्यक कारवाई करता येईल, असे चोक्कलिंगम यांनी पत्रात नमूद केले आहे. नोव्हेंबर २०२४ मध्ये झालेल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकांपूर्वी जाहीर करण्यात आलेल्या मसुदा आणि अंतिम मतदार यादीवर काँग्रेसने कोणताही औपचारिक आक्षेप नोंदवलेला नाही, याकडे मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी राहुल गांधी यांचे लक्ष वेधले आहे. तुमच्या विधानाबाबत मतदार नोंदणी नियम १९६० च्या नियम २० अंतर्गत हे विधान सत्य आहे, अशी घोषणा करणे आवश्यक आहे. तसेच चुकीची माहिती देणे ही लोकप्रतिनिधी अधिनियम १९५० च्या कलम ३१ अंतर्गत शिक्षेस पात्र ठरते, असा इशाराही गांधी यांना दिलेल्या पत्रात दिला आहे.

## शालार्थ घोटाळ्याची २०१२ पासून चौकशी

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्य सरकारला शेकडो कोटींचा चुना लावणाऱ्या बनावट शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या शालार्थ घोटाळ्याची चौकशी सन २०१२ पासून केली जाणार आहे. या चौकशीसाठी शालेय शिक्षण विभागाने पुण्याचे विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या नेतृत्वाखाली विशेष चौकशी पथक (एसआयटी) गठीत केले आहे. विभागाने गुरुवारी यासंदर्भातील शासन निर्णय जारी केला. एसआयटीला चौकशी अहवाल तीन महिन्याच्या आत सादर करण्यास सांगण्यात आले आहे. या चौकशी समितीत सदस्य म्हणून पोलीस महानिरीक्षक मनोज शर्मा यांचा समावेश आहे.

# शेतकरी हिताशी तडजोड नाही : मोदी

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

देश आपल्या शेतकरी, मच्छीमार आणि दुग्ध क्षेत्राच्या हिताशी कधीही तडजोड करणार नाही. गरज पडल्यास मी मोठी किंमत मोजण्यास तयार आहे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी जाहीर केले. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतीय वस्तूंवरील आयात शुल्क ५० टक्क्यांपर्यंत वाढवण्याची घोषणा केल्याच्या पार्श्वभूमीवर त्यांनी हा निर्धार केला आहे.



देशाच्या हरितक्रांतीचे शिल्पकार कृषिशास्त्रज्ञ एम. एस. स्वामीनाथन यांच्या जन्मशताब्दीनिमित्त आयोजित जागतिक परिषदेत मोदी बोलत होते. स्वामीनाथन यांच्या सन्मानार्थ एक नाणे आणि टपाल तिकिटाचे अनावरण पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते करण्यात आले.

भारतीय शेतीसाठीचा स्वामीनाथन यांचा दृष्टिकोन मांडताना, पंतप्रधानांनी पोषण सुरक्षा, पीक विविधीकरण आणि हवामान-प्रतिरोधक वाणांच्या विकासाची गरज अधोरेखित केली. प्रत्येक जिल्ह्यात प्रत्यक्ष निर्णय समर्थन प्रणाली उपलब्ध करून देण्याची सूचना पंतप्रधान मोदी यांनी यावेळी केली.

# बनावट दाखल्यांद्वारे फसवणूक

### अण्णासाहेब पाटील महामंडळाची तक्रार

**नाशिक । प्रतिनिधी**

अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या योजनेचा गैरफायदा घेऊन शाळा सोडल्याच्या दाखल्यात खाडाखोड करून आर्थिक फसवणूक केल्याचा गंभीर प्रकार नाशिक आणि अहिल्यानगरमध्ये उघडकीस आला आहे. याप्रकरणी महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनी नाशिक पोलीस आयुक्तांकडे तक्रार दाखल केली असून, राज्यभरातील सर्व कार्यालयांमध्ये अशा घटनांची चौकशी करण्याचे निर्देश दिले आहेत.

यासंदर्भात गुरुवारी (दि.७) नाशिकमध्ये आयोजित पत्रकार परिषदेत नरेंद्र पाटील यांनी ही माहिती दिली. पाटील म्हणाले, मराठा समाजातील आर्थिकदृष्ट्या मागास घटकांसाठी स्थापन झालेल्या या महामंडळामार्फत आतापर्यंत १.५ लाख लाभार्थ्यांना १२ हजार ६०० कोटींचे कर्ज वितरित झाले असून, १,२२२ कोटींचा व्याज परतावा देण्यात आला आहे. नाशिक विभागात ३६ हजार ४७७ लाभार्थ्यांना २७९८ कोटींचे कर्ज आणि २५३

पान ८ वर

## थोडक्यात

### माजी आमदार दुर्राणी यांचा काँग्रेस प्रवेश

**मुंबई ।** विधानसभा निवडणुकीतील नामुष्कीजनक पराभवामुळे काँग्रेसला गळती लागलेली असताना राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी आमदार आणि परभणी जिल्ह्यातील नेते बाबाजानी दुर्राणी यांनी गुरुवारी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या उपस्थितीत काँग्रेस पक्षात प्रवेश केला. काँग्रेसचे माजी सुरेश वरपुडकर यांनी भाजपमध्ये प्रवेश केल्याने काँग्रेसने दुर्राणी यांना पक्षात प्रवेश देऊन परभणीत पक्षाची ताकद वाढविण्याचा प्रयत्न केला आहे. दुर्राणी यांच्यासह परभणीतील माजी नगराध्यक्ष, माजी नगरसेवक, जिल्हा बँकेचे संचालक, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती, संचालकांनीही काँग्रेस पक्षात प्रवेश केला.

## शेअर बाजार

| | |
|---|---|
| सेन्सेक्स | : ८०६२३ (+७९) |
| निफ्टी | : २४५९६ (+२२) |

## सोने-चांदी

| सोने (प्रति १० ग्रॅम) | |
|---|---|
| २४ कॅरेट | १,००,५०० |
| २२ कॅरेट | ९२,४६० |
| चांदी (प्रतिकिलो) | १,१४,००० |

## तापमान

| | |
|---|---|
| किमान | : २१.९° |
| कमाल | : ३१.०° |

## कांदा भाव

| | |
|---|---|
| किमान | : ६५१ |
| कमाल | : १७९१ |
| सरासरी | : १३४० |

## मिश्किली




# धावत्या रेल्वेखाली दाम्पत्याची आत्महत्या

**घोटी । वार्ताहर**



शहरालगत असलेल्या रेल्वेलाईनवर एका दाम्पत्याने आत्महत्या केल्याची घटना सायंकाळी सहाच्या सुमारास घडली. आत्महत्येचे कारण समजू शकले नाही.

दिनेश देवीदास सावंत (वय ३८) व भाग्यश्री (वय ३३, रा. घोटी, सुधानगर) ही आत्महत्या केलेल्या पती-पत्नीची नावे आहेत. या घटनेची माहिती मिळताच परिसरातील युवक व ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेऊन दाम्पत्याचे मृतदेह घोटी ग्रामीण रुग्णालयात आणले. मृत दाम्पत्य महिंद्रा कंपनीचे सेवानिवृत्त कर्मचारी दिनकर सावंत यांचा मुलगा व सून होते. दिनेशही इगतपुरी महिंद्रा कंपनीत नोकरीस होते. घोटी पोलिसात आकस्मित मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

# उत्तराखंडात मालेगावचे यात्रेकरू सुखरूप

**मालेगाव, नाशिक । प्रतिनिधी**

उत्तराखंडमधील उत्तरकाशी भागात ढगफुटीमुळे निर्माण झालेल्या आपत्तीत अडकलेले व गेले दोन दिवस संपर्क कक्षाबाहेर गेलेले येथील सात यात्रेकरू सुखरूप असल्याचा दूरध्वनी काल गुरुवारी सायंकाळी आल्याने चिंताग्रस्त कुटुंबीय व नातेवाईकांचा जीव भांड्यात पडला.

येथील बांधकाम व्यावसायिक सुरेश येवला, त्यांच्या पत्नी, मुलगा अनिकेत तसेच दीपक कोतकर, त्यांच्या पत्नी शुभांगी, मुले शर्विल व शौनक हे सात यात्रेकरू चारधाम यात्रेसाठी एक ऑगस्ट रोजी शुभयात्री ट्रॅव्हल्स कंपनीच्या माध्यमातून नाशिकहून रेल्वेने गेले होते. मंगळवारी दर्शन झाल्यानंतर बारा वाजेच्या सुमारास हे सातही यात्रेकरू गंगोत्रीहून उत्तरकाशीस देवदर्शनासाठी जात होते. मात्र धरली परिसरात ढगफुटी झाल्याने या भागातील नदीला मोठा पूर आल्याने

पान ८ वर

## एनएचआरडीएफ संचालकपदी होळकर

**लासलगाव । वार्ताहर**



नवी दिल्ली येथील नॅशनल हॉर्टिकल्चरल रिसर्च अँड डेव्हलपमेंट फाउंडेशनच्या (एनएचआरडीएफ) संचालकपदी नाशिकच्या भाजीपाला व फळबाग सहकारी खरेदी-विक्री संस्थेचे (वेफको) संजय चांगदेव होळकर यांची बिनविरोध निवड झाली आहे.

एनएचआरडीएफचे अध्यक्ष बिजेन्द्रसिंग

पान ८ वर

# पोलिसांविरुद्ध तक्रारींचा पाऊस

## प्राधिकरणाकडे साडेसात वर्षांत अकराशे प्रकरणे

- **६९७ अर्जांवर कार्यवाही**
- **प्रलंबित प्रकरणांचा निपटारा**

**नाशिक । भारत पगारे**

नाशिक विभागाच्या पोलीस तक्रार निवारण प्राधिकरणात पोलीस शिपायापासून ते वरिष्ठ पोलीस निरीक्षक दर्जापर्यंतच्या अधिकाऱ्यांविरुद्ध गेल्या साडेसात वर्षांत विविध स्वरुपाचे तब्बल १ हजार ११२ प्रकरणे व तक्रारी दाखल झाल्या आहेत. त्यातील ६९७ प्रकरणे निकाली काढण्यात आली असून, ४१५ प्रकरणे प्रलंबित आहेत. त्यानुसार कार्यवाही सुरु असल्याचे विभागस्तरीय प्राधिकरणाचे सदस्य सचिव तथा सहायक पोलीस आयुक्त संदीप मिटके यांनी सांगितले आहे. या प्राधिकरणात नागरिक संबंधित पोलिसांविरुद्ध तक्रारी नोंदवू शकतात.

महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ मधील तरतुदींनुसार, नाशिक येथे महाराष्ट्र विभागस्तरीय पोलीस तक्रार प्राधिकरण


पान ८ वर

### दृष्टिक्षेपात

- सन २०१८ ते ३१ जुलै २०२५ पर्यंत १, ११२ प्रकरणे दाखल
- ६९७ प्रकरणाचा निपटारा
- ४१५ प्रकरणे प्रलंबित
- जलद गतीने निकाली काढण्याचे प्रयत्न

### पूर्ण खंडपीठ

सेवानिवृत्त प्रमुख जिल्हा न्यायाधीश अशोक भटकर हे या प्राधिकरणाचे अध्यक्ष आहेत. तर, सेवानिवृत्त पोलीस अधीक्षक सुनील कडासने व अमित डमाळे (नागरी समाजातील प्रतिष्ठित व्यक्ती) यांची सदस्यपदी नियुक्ती झाली असून ऑक्टोबर २०२४ पासून प्राधिकरणाचे पूर्ण खंडपीठ कार्यरत आहे. दरम्यान पोलीस उपायुक्त चंद्रकांत खांडवी हे प्राधिकरणाचे कार्यालय प्रमुख तथा सदस्य आहेत.




नाशिक ■ नाशिक ■ जळगाव ■ धुळे ■ नंदुरबार ■ अहमदनगर येथून एकाच वेळी स्वतंत्रपणे प्रकाशित

www.facebook.com/deshdoot